Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक २०वा | जानेवारी २०२३

## आमचे ध्येय

***गरिबीचे पिढ्यानपिढ्याचे चक्र खंडित करा, एका वेळी एक जीवन.***

गेल्या १५ वर्षांहून अधिक काळात ग्रामीण भारतातील ३,९८,३२९ पेक्षा जास्त व्यक्तींचे जीवन प्रभावित करण्यात आम्हाला यश मिळाले आहे. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. ॲश्दीन डॉक्टर** – विश्वस्त




क्रेडीबिलीटी अलायन्स मान्यता प्राप्त

टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS) राष्ट्रीय CSR हब सह एम्पॅनेलमेंट

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला प्रशंसापत्र प्रदान

दिनांक १५ डिसेंबर २०२२ रोजी, नंदुरबार येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टमहिला सक्षमीकरण केंद्र – तळोदा यांना महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) तर्फे प्रशंसापत्र प्रदान करण्यात आले. तळोदा केंद्रातील लाभार्थींसाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड मान्यताप्राप्त प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल हे प्रशंसापत्र संस्थेला मिळाले.

दिनांक १५ डिसेंबर २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अकोला जिल्ह्यातील, रॅलीस इंडिया लिमिटेड यांचे पाठबळ लाभलेल्या शिवार येथील जीवनआशा समुदाय केंद्राला, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती वीणा कामथ यांच्या हस्ते प्रशंसापत्र प्रदान करण्यात आले.








**लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट बिल डेस्कवर आहे. तसेच ४७ बँकांच्या बिल पे टॅबवरही आहे.**

DBS | DCB BANK | HDFC BANK | IndusInd Bank | kotak | standard chartered | YES BANK

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी अभिमानाचा क्षण



दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी, ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या रोजगार प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्रातील जांबुर्डे गावातील शिवणकाम व टेलरिंग लाभार्थ्यांना महिला व बालकल्याण विभाग, ठाणे यांच्या 'स्वयंरोजगार विक्री केंद्र' योजनेअंतर्गत चाकांवरील दुकानांचे वाटप करण्यात आले. सर्व महिला लाभार्थींनी यामध्ये शिवणकामाचे छोटे दुकान सुरू केले आहे.

## प्राची, आम्हाला तुझा अभिमान वाटतो!

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी अभिमानास्पद गोष्ट म्हणजे, डिक्सळ केंद्रातील अनंत प्लसची विद्यार्थिनी कु. प्राची साळोखे हिने ३०० स्पर्धकांपैकी 'आवाज बदलापूरचा' या गायन स्पर्धेत अंतिम फेरी पर्यंत मजल मारली. अंतिम फेरीसाठी निवडलेल्या २६ स्पर्धकांपैकी ती एक होती.





## एचडीएफसी क्रेडीलायांचे पाठबळ लाभलेल्या शालेय सक्षमीकरण कार्यक्रमातील २ शाळांमध्ये संगणक कक्ष व विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप

दिनांक ०७ ऑक्टोबर २०२२ रोजी, एचडीएफसी क्रेडिलाच्या श्रीमती नताशा राज व श्रीमती राजनंदिनी बर्मन यांच्या उपस्थितीत, एचडीएफसी क्रेडिला यांचे पाठबळ लाभलेल्या दोन शाळांमध्ये संगणक कक्षव विज्ञान प्रयोगशाळांचे उद्घाटन आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.









## नरेश, आम्हाला तुझा अभिमान वाटतो!

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी अभिमानास्पद गोष्ट म्हणजे आनंदो प्लसचे विद्यार्थी श्री नरेश फोपे यांनी दापोली येथील श्री रामराजे कॉलेजमधून हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटमध्ये बीएससी पूर्ण केले. नवी मुंबईतील थ्रीस्टार हॉटेलमध्ये ४ वर्षे कामाचा अनुभव घेतल्यानंतर, श्री नरेश फोपे यांनी कार्निव्हल क्रूझ लाईन, मायामी, दक्षिण फ्लोरिडा, अमेरिका येथे सहाय्यक आचारी म्हणून नोकरी मिळवली आहे.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट तर्फे, युनिव्हर्सल बिझनेस स्कूलच्या सहकार्याने, स्मार्ट प्रोग्राम अंतर्गत बीबीएच्या विद्यार्थ्यांसाठी सामाजिक विकास कार्यक्रमाचे आयोजन

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सोबत १४ ते १८ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत विविध उपक्रमांसाठी 'SMART' या सामाजिक विकास कार्यक्रमाअंतर्गत स्वयंसेवा करणाऱ्या, युनिव्हर्सल बिझनेस स्कूलमधील बीबीएच्या १२० विद्यार्थ्यांसाठी, दिनांक २२ नोव्हेंबर २०२२ रोजी, एक समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रोजगार प्रशिक्षणव कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन या प्रकल्पांतर्गत विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी गट तयार करण्यात आले. युनिव्हर्सल बिझनेस स्कूल, कर्जत येथे पार पडलेल्या या प्रसंगी डॉ. वहिदा –उपसंचालक (बीबीए) आणि विद्यार्थी सहभाग प्रमुख–यूबीएस, प्रा. ब्रिगेडियर जीपीएस चीमा कार्यक्रम संचालक व फॅकल्टी – ह्युमन रिसोर्स, लीडरशिप, विजडम टूवर्ड्स एक्सलन्स –यूबीएस इत्यादी मान्यवर तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी उपस्थित होते.



## वरळी केंद्रात डिजिटल वर्गाचे उद्घाटन

आमचे भागीदार व देणगीदार दालामल कुटुंबीय यांच्या देणगीतून वरळी केंद्रात विद्यार्थ्यांना शिकण्यास उपयुक्त असे स्मार्ट लर्निंग बोर्ड प्रथमच बसविण्यात आले. या मुळे विद्यार्थ्यांना दृकश्राव्य शिक्षण पद्धतीच्या नव्या जगताशी जोडून, देवाणघेवाणीच्या अनुभवातून त्यांचे ज्ञान समृद्ध करता येईल.



Educate | Empower | Employability

## जर्मनीच्या चान्स ऑफ लाईफच्या श्रीमती रिटा स्टीनो यांची संस्थेला भेट

दिनांक २ ऑक्टोबर २०२२ रोजी, श्रीमती रीटा रोमर्ट-स्टीनो, चेअरपर्सन, चान्स ऑफ लेबेन ई.व्ही. (चान्स ऑफ लाईफ) यांनी रायगड- महाराष्ट्र येथील कर्जत तालुक्यात लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या चौक आणि मोहिली केंद्रांना भेट दिली. चौक, मोहिली आणि कोंदीवडे केंद्रातील, चान्स ऑफ लाईफ जर्मनी यांचे पाठबळ मिळालेल्या १४० लाभार्थी विद्यार्थिनीया कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. लाभार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीबद्दलया कार्यक्रमात माहिती दिली.





## आमच्या भागीदार संस्थांची लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या केंद्रांना भेट


दिनांक १३ डिसेंबर २०२२ रोजी, श्री बिस्वरंजन सबात, श्रीमती आश्लेषा नातू, श्रीमती कल्पना चव्हाण, आणि एसबीआय सीवूड्स या सहाय्यक भागीदार संस्थेचे प्रतिनिधी श्री. अमोल जावके यांनी कशेळे आणि तिवरे येथे असलेल्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या रोजगार व कौशल्य विकास केंद्राला भेट दिली. लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांची प्रगती जाणून घेणे हा या भेटीचा उद्देश होता.



## जागतिक दृष्टी दिनानिमित्त उपक्रम



दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी, मुरबाड आणि कर्जत येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या फिरत्या दवाखान्यांच्या कर्मचाऱ्यांनी, ईशा नेत्रालय आणि नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने 'डोळ्यांचे आजार व आरोग्य' या विषयावर ऑनलाइन सत्राचे आयोजन केले होते. या सत्रामध्ये, कर्जत तालुक्याच्या ७ शाळांमधील ४५० लाभार्थ्यांसाठी डॉ. संतोष कुमार नायर, वैद्यकीय संचालक आणि श्रीमती प्रियांका रावराणे प्राध्यापक व वरिष्ठ नेत्रतज्ज्ञ - नायर सुपर स्पेशालिटी नेत्र रुग्णालय, नवीन पनवेल या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

## अनंत कार्यक्रमाच्या कर्मचाऱ्यांनी साजरी केली दिवाळी पहाट

दिनांक २८ ऑक्टोबर २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अनंतच्या कर्मचाऱ्यांनी कर्जतमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रम साजरा केला. या कार्यक्रमात अनंतच्या १३८ लाभार्थी विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन, अनंत कार्यक्रमांतर्गत शिकलेली, गायन, नृत्य आणि तबला वादन कला सादर केली. श्रीमती सुमिता अंबास्ता, संस्थापक आणि कार्यकारी संचालक, फ्लॉवरिंग ट्री इं.कॉ. आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.





## जागतिक हँडवॉश दिनानिमित्त उपक्रम



दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ या जागतिक हँडवॉश दिनानिमित्त, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत येथील फिरत्या दवाखान्यांच्या ४० लाभार्थ्यांसाठी अरवंद गावात 'हँडवॉश' या विषयावर जनजागृती सत्र आयोजित केले होते.



amazonsmile
You shop. Amazon gives.

अमेझोन तुमच्या पात्र अमेझोन स्माईल खरेदीच्या किंमतीपैकी ०.५ % तुमच्या पसंतीच्या धर्मादाय संस्थेला दान करते. **QR कोड स्कॅन करून** लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला सपोर्ट करा किंवा खालील लिंकला भेट द्या.
**http://smile.amazon.com/ch/20-5402443**

## राष्ट्रीय गणित दिवस साजरा

भारताचे प्रतिभावानगणिती श्रीनिवास रामानुजन (जन्म १८८७) यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी,दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सर्व केंद्रांवर 'राष्ट्रीय गणित दिवस' साजरा करण्यात आला. यानिमित्त लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने वक्तृत्व, गणित प्रश्नमंजुषा इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांचा आनंद लुटला, आणि गणिताच्या मूलभूत संकल्पना मनोरंजक पद्धतीने शिकून घेतल्या.





## ॲटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीच्या स्टेज क्लबतर्फे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रात ख्रिसमस पार्टीचे आयोजन

दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी, ॲटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीच्या स्टेज क्लबच्या १० सदस्यांतर्फे ख्रिसमस पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रातील ४१ लाभार्थ्यांनी याप्रसंगी विविध मनोरंजक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.





## अलिबाग केंद्रातील आनंदो प्लसच्या लाभार्थ्यांनी सुरू केलेला उद्योजक उपक्रम : 'कोकण क्राफ्ट'

दिवाळीमध्ये, आनंदो प्लसच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने श्रीमती मानसी शेट्ये यांनी, नारळाच्या करवंट्यापासून शोभेच्या वस्तू बनविण्याचा 'कोकण क्राफ्ट' नावाचा एक छोटा उद्योजक उपक्रम सुरू केला.

ही उत्पादने तयार करण्यासाठी, नाशिकच्या अर्थकेअर ऑर्गनायझेशनच्या श्रीमती साठे यांनी विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रशिक्षण कार्यशाळा घेतली आणि वस्तू बनविण्यासाठी यंत्रसामग्री व साधने उपलब्ध करून दिली. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी आता वस्तूंची विक्री करून चांगले उत्पन्न मिळवत आहेत.






## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्रामध्ये, मुंबईच्या द कॅथेड्रल अँड जॉन कॉननशाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण



दिनांक १९ नोव्हेंबर २०२२ रोजी, मुंबईच्या कॅथेड्रल आणि जॉन कॉनन शाळेतील ३६ विद्यार्थी आणि तीन शिक्षकांनी, कर्जत तालुक्यातील तिवरे गावात जीवन आशा समुदाय केंद्रांना भेट दिली आणि ५५ रोपांची लागवड केली. यामध्ये रंगीत गुलाबांची ४० आणि १५ इनडोअर प्रकारची रोपे होती.



## पाणीगाडे वाटप




दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी, तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्रात बिल्लाबॉन्ग हाय इंटरनॅशनल स्कूलच्या सहकार्याने पाणी गाड्यांचे वाटप करण्यात आले. याअंतर्गत कर्जत तालुक्यातील कोशाणेवाडी येथील लाभार्थ्यांना २८ पाणी गाड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री रिचर्ड केंब्रिज, बिल्लाबॉन्ग हाय इंटरनॅशनल स्कूलचे चार विद्यार्थी आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जागृती प्रकल्पाचे कर्मचारी उपस्थित होते.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट बिल डेस्कवर आहे. तसेच ४७ बँकांच्या बिल पे टॅबवरही आहे.

DBS · DCB BANK · HDFC BANK · IndusInd Bank · kotak · standard chartered · YES BANK

# ठळक बातम्या व ताज्या घडामोडी

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या लाभार्थ्यांना मुंबई आयआयटी, पवई येथे युसुफ हमीद रसायनशास्त्र शिबिरात सहभागी होण्याची सुवर्ण संधी



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सात विद्यार्थ्यांनी, आयआयटी पवई येथे, दिनांक ६ ते ८ डिसेंबर २०२२ या कालावधीत संपन्न झालेल्या युसुफ हमीद रसायनशास्त्र शिबिरात भाग घेतला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट पुरस्कृत चार शाळांतील इयत्ता नववीच्या सात विद्यार्थ्यांना या शिबिरात सहभागी होऊन प्रात्यक्षिक प्रयोग बघण्याची उत्तम संधी मिळाली. सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे याबद्दल आभार मानले.




## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातर्फे आर्थिक साक्षरता सत्राचे आयोजन



दिनांक १८ ऑक्टोबर २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुरबाड तालुक्यातील कौशल्य आणि रोजगार प्रशिक्षण केंद्र, धसई येथील लाभार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

माजी आमदार श्री. दिगंबर विशे, श्री. विश्वजीत करंजीकर, एजीएम – रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,श्रीमती राधा व श्रीमती रचना –रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, श्रीमती भारती वश्रीमतीसविता पावसकर –बँक ऑफ महाराष्ट्र, श्री भूपेंद्र, शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ बडोदा तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी यांच्या उपस्थितीत हे सत्र पार पडले.



## विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम



श्री हेमंत लागवणकर, सायन्स कम्युनिकेटर आणि शैक्षणिक सल्लागार यांनी, दिनांक ९ व १० नोव्हेंबर २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या विज्ञान शिक्षकांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. विज्ञानातील मूलभूत संकल्पना स्पष्ट करणे आणि थेट प्रयोगांचा वापर करून अध्यापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धती शिकवणे हाप्रशिक्षणाचा उद्देश होता. या प्रशिक्षणाचा उपयोग शिक्षकांना वर्गात शिकविताना होईल. त्याचसोबत विद्यार्थ्यांना थेट प्रयोगांमधून ज्ञान मिळविण्यासाठी व विषयातील मूलभूत संकल्पना मजबूत करण्यासाठीही हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे.



## डेलॉइट संस्थेच्या स्वयंसेवकांकडून आनंदो विद्यार्थ्यांसाठी सत्राचे आयोजन

दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रात आनंदो लाभार्थ्यांसाठी डेलॉइट संस्थेच्या स्वयंसेवकांकडून व्यक्तिमत्व विकास या विषयावर सत्र आयोजित करण्यात आले होते. विविध विषयांबद्दलआपली समज कशी वाढवावी आणि आपली वैयक्तिक मते इतरांपेक्षा कशी वेगळी असू शकतात या विषयांवर हे सत्र आधारित होते. या सत्रात ४० लाभार्थ्यांनी सहभाग घेतला.



## ठळक बातम्या व
# ताज्या घडामोडी

## वरळी केंद्राच्या विद्यार्थ्यांची नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टला भेट




दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ रोजी, दिवाळीच्या दीपोत्सव कालावधीत,लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्राच्या विद्यार्थ्यांनी मुंबईच्या नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट येथेभेट दिली. दिवे बनवण्याच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन रंगीत कागदांपासून थ्रीडी दिवे बनविले. त्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्र मिळाले.



## वरळी केंद्राच्या विद्यार्थ्यांचा प्लॅटिनम कॉर्पोरेशन क्रिकेट इव्हेंट मध्ये सहभाग

दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी, प्लॅटिनम कॉर्पोरेशनने सेंट अँड्रयू टर्फ पार्क, वांद्रे येथे आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्याची संधी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रातील ४० विद्यार्थ्यांना मिळाली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना कॅन्सरवर उपचार करणारे डॉक्टर्स, इन्फ्लुएन्सर्स, गायक आणि क्रिकेटर्सना भेटण्याची संधी मिळाली.



## टाटा मुंबई मॅरेथॉन, १५ जानेवारी २०२३

१५ जानेवारीची रम्य सकाळ, मॅरेथॉन धावण्यासाठी तापमान अगदी सुयोग्य होते. धावण्यासाठी उत्साह धावपटूंच्या नसांतून अगदी ओसंडून वाहत होता. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे, ट्रस्टला पाठींबा देण्यासाठी ६०० पेक्षा जास्त धावपटू टाटा मुंबई मॅरेथॉन, २०२३ मध्ये सहभागी झाले होते. यामध्ये ११ कॉर्पोरेट क्षेत्रातील, पूर्ण मॅरेथॉनर्स, हाफ मॅरेथॉनर्स, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची १५० हून अधिक लाभार्थी मुले तसेच ग्रामीण भारतातून आलेले कर्मचारी सहभागी झाले होते. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो प्लसचे १८ लाभार्थी १० किलोमीटर रन आणि हाफ मॅरेथॉन धावले. चिरकाळ स्मरणात राहील अशी ही मॅरेथॉन होती.















## संपर्क

### मुख्य कार्यालय

वन बीकेसी, सी–विंग, युनिट क्रमांक: १५१९, प्लॉट नं.: सी–६६,
जी–ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पु),
मुंबई – ४०० ०५१. दूरध्वनी: +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल: connect@lightoflifetrust.org

### शाखा कार्यालये:

**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** सिवनी **ओडिशा :** अंगुल
**राजस्थान :** बिजोलिया, सिकर

www.lightoflifetrust.org +91-9820229445

@LightOfLifeTrustIndia @lightoflifetrust_lolt @lightoflifetrst lightoflifetrust youtube.com/c/lightoflifetrust



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला पेटीएमवरून देणगी देण्यासाठी
लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला ऑनलाइन देणगी देण्यासाठी

Contribute Now ! Paytm

https://m.paytm.me/LOLT